जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे
दैनिक | वर्ष १ | अंक २२१ | शनिवार, ७ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### महापालिकेत नोकरी लागल्याचे बनावट नियुक्तीपत्र

**पिंपरी, ता. ६ :** पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये शिपाई पदावर नोकरी देण्याचे आमिष दाखवून एका तरुणाकडून पैसे घेतले. त्यानंतर तरुणाला बनावट सही शिक्क्याचे नियुक्तीपत्र आणि उमेदवारांच्या नावाचे परिपत्रक देऊन नोकरी लागल्याची खात्री पटवून दिली. तरुणाने महापालिकेमध्ये याबाबत चौकशी केली असता अशा प्रकारे कोणतीही भरती प्रक्रिया राबवली नसल्याचे उघडकीस आले. त्यानंतर तरुणाने पोलिसात धाव घेत गुन्हा नोंदवला. याप्रकरणी २६ वर्षीय तरुणाने संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका तरुणाविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड महापालिकेने मागील काही महिन्यांमध्ये कोणतीही पदभरती केलेली नाही. आरोपी आणि फिर्यादी हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. महापालिकेत शिपाई पदांसाठी भरती सुरु असल्याचे सांगून फिर्यादीला नोकरी लावून देतो, असे आमिष दाखवले. खात्री पटावी यासाठी त्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड अशी कागदपत्रे देखील घेतली. त्यांच्याकडून वेळोवेळी सहा हजार ५०० रुपये घेतले.

# अजितदादांच्या स्वप्नातील अर्थसंकल्प सादर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## शेतकऱ्यांना कर्जमाफी तर पुणेकरांसाठी घोषणांचा पाऊस, कृषी क्षेत्राला होणार फायदा

**मुंबई, ता. ६ :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर निमाण झालेली पोकळी आणि राज्याची आर्थिक जबाबदारी खांद्यावर घेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. हे बजेट माझे सहकारी अजितदादांनीच तयार केले होते, मी केवळ मांडत आहे, अशा शब्दांत फडणवीसांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली.



अजित पवार आणि महाराष्ट्राचा अर्थसंकल्प हे गेल्या दशकातील एक अतूट समीकरण होते. ११ वेळा दादांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडला होता. यंदाही त्यांनी बहुतांश तयारी पूर्ण केली होती. मात्र, नियतीने त्यांना हिरावून नेले. माझं अंतःकरण आज जड झालं आहे. दादांच्या करड्या स्वभावामुळे राज्याच्या तिजोरी सुरक्षित राहिली, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, फडणवीसांनी अर्थसंकल्प आपल्या दिवंगत सहकाऱ्याला म्हणजेच अजितदादांना समर्पित केला.

अजितदादांचा स्वभाव हा मुळातच अभ्यासू आणि कामाचा उरक असलेला. यावेळचा अर्थसंकल्प मांडण्यासाठी दादांनी गेल्या अनेक महिन्यांपासून रात्रंदिवस एक करून प्रत्येक विभागाचा सखोल अभ्यास केला होता. राज्याच्या तिजोरीचा कणा असलेला शेतकरी पुन्हा उभा राहावा, ही त्यांची तळमळ होती. म्हणूनच, त्यांनी अत्यंत बारकाईने विचार करत ज्या शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज थकीत आहे, त्यांना या ओझ्यातून पूर्णपणे मुक्त करण्याचा विचार दादांनी केला होता. दादा आज आपल्यात नसले, तरी त्यांनी घेतलेला हा कष्टकरी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा निर्णय त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देणारा ठरला आहे.

शेतकऱ्यांसाठी यंदा मोठे दिलासादायक निर्णय घेण्यात आले आहेत. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत पीक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करण्यात आली आहे. यांतर्गत २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ होईल, तर नियमित परतफेड करणाऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान मिळेल.तसेच गोपीनाथ मुंडे अपघात योजने अंतर्गत आता शेतमजुरांनाही संरक्षण मिळणार आहे.

अजितदादांच्या नजरेतून पुण्याचा विकास कधीच सुटला नाही आणि पुण्यातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी अत्यंत बारकाईने आराखडा तयार केला आहे. शहराच्या वाहतूक आणि दळणवळण व्यवस्थेचा चेहरामोहरा बदलणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये पुणे-लोणावळा दरम्यानच्या तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गिकेसाठी ५,१०० कोटींच्या प्रकल्पास मान्यता मिळाली असून, याचा सर्वाधिक फायदा पिंपरी-चिंचवड, आकुर्डी आणि तळेगाव या औद्योगिक पट्ट्यांना होणार आहे.

मेट्रोच्या जाळ्याचा विस्तार करताना खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि रामवाडी ते वाघोली या ११ किमीच्या मार्गाला हिरवा कंदील मिळाला असून, हडपसर ते लोणी काळभोर आणि सासवड रोड या उपमार्गांनाही मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय, येरवडा ते कात्रज आणि हिंजवडी ते सिंहगड रोड या ५४ किमीच्या दुहेरी मार्गाचे नियोजन सुरू आहे.

रस्ते विकासाबाबत बोलायचे झाले तर, पुणे ते शिरूर ५३ किमीचा ७,५१४ कोटींचा प्रकल्प, तळेगाव-चाकण उन्नत मार्ग चाकण-शिक्रापूर आणि हडपसर-यवत दरम्यान सहा पदरी रस्ता तयार करणार यामुळे प्रवासाचा वेग वाढणार आहे. पुणे ते छत्रपती संभाजीनगर प्रवासासाठी शिरूर ते संभाजीनगर या १९२ किमीच्या ग्रीनफिल्ड महामार्गाचा आराखडा तयार करण्याचे काम वेगाने सुरू असून, देहू येथील संत तुकाराम महाराज पवित्र स्थळाच्या विकास आराखड्याचीही महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली आहे.

### तंबाखूजन्य पदार्थांवर अधिक कर


अर्थसंकल्पात आरोग्याला प्राधान्य देत व्यसनाधीनतेवर लगाम घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सर्वसामान्यांसाठी सर्वात मोठा दिलासा म्हणजे कर्करोग आणि मधुमेहावरील औषधे आता स्वस्त होणार आहेत, ज्यामुळे हजारो रुग्णांना आधार मिळेल. यासोबतच सौर ऊर्जा वापराला प्रोत्साहन देण्यासाठी सौर पॅनेल, खेळाडूंसाठी क्रीडा साहित्य आणि रुग्णालयांसाठी आवश्यक असलेली वैद्यकीय उपकरणे यांच्या किमतीत घट करण्यात आली आहे. याउलट, परदेशी व देशी मद्य (दारू), सिगारेट आणि विडी तसेच सर्व तंबाखूजन्य पदार्थांवर अधिक कर लावण्यात येणार असल्याने ते महाग होणार आहेत.

### कर्करोगावरील औषधे स्वस्त

यंदाच्या अर्थसंकल्पात अजितदादांचे व्हिजन आणि देवेंद्र फडणवीसांच्या कामाची गती यांचा संगम यात पाहायला मिळतो. कर्करोगावरील औषधे स्वस्त करून सरकारने संवेदनशीलतेचा परिचय दिला आहे, तर पायाभूत सुविधांवर दिलेला भर राज्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. दरम्यान, घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि शहरी अर्थव्यवस्थेला मोठी उभारी मिळेल.

# यूपीएससी नागरी सेवा परीक्षेचा निकाल जाहीर; अनुज अग्निहोत्री देशात प्रथम

**नवी दिल्ली, ता. ६ :** केंद्रीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा परीक्षा २०२५ अंतिम निकाल जाहीर केला आहे. याची लेखी परीक्षा ऑगस्ट २०२५ मध्ये घेण्यात आली होती, तर मुलाखती डिसेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान पार पडल्या होत्या. या दोन्ही टप्प्यांच्या आधारे आयोगाने एकूण ९५८ उमेदवारांची विविध केंद्रीय सेवांसाठी शिफारस केली आहे.




निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती भारतीय प्रशासकीय सेवा (IAS), भारतीय परराष्ट्र सेवा (IFS), भारतीय पोलीस सेवा (IPS) तसेच केंद्र सरकारच्या गट अ आणि ब सेवांमध्ये केली जाणार आहे. या वर्षीच्या परीक्षेत अनुज अग्निहोत्री यांनी देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर राजेश्वरी सुवे एम, तिसऱ्या क्रमांकावर आकांश धुल्ल, चौथ्या क्रमांकावर राघव झुनझुनवाला आणि पाचव्या क्रमांकावर ईशान भटनागर यांनी स्थान मिळवले आहे.

आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा निवड झालेल्या उमेदवारांमध्ये ३१७ सामान्य प्रवर्गातील, १०४ आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ३०६ इतर मागासवर्गीय, १५८ अनुसूचित जाती, आणि ७३ अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांचा समावेश आहे.

**दोन उमेदवारांचे निकाल रोखून ठेवले**

तसेच काही उमेदवारांची उमेदवारी तात्पुरती (प्रोव्हिजनल) ठेवण्यात आली असून दोन उमेदवारांचा निकाल रोखून ठेवण्यात आल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. परीक्षेचे गुण आणि इतर तपशील निकाल जाहीर झाल्यानंतर सुमारे १५ दिवसांत आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा ही देशातील सर्वात प्रतिष्ठित स्पर्धा परीक्षा मानली जाते.

| निवड झालेल्या उमेदवारांचे प्रमाण |
|---|
| सामान्य प्रवर्ग : ३१७ |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल (EWS): १०४ |
| इतर मागासवर्ग (OBC) : ३०६ |
| अनुसूचित जाती (SC) : १५८ |
| अनुसूचित जमाती (ST) : ७३ |


### दुचाकी चोरट्याकडून तब्बल २० दुचाकी जप्त

**पुणे, ता. ६ :** मौजमजा करण्यासाठीसाठी शहराच्या वेगवेगळ्या भागातून दुचाकी चोरणाऱ्या चोरट्यांना उत्तमनगर पोलिसांनी अटक केली. त्यापैकी एकाला अटक करण्यात आली असून त्याच्या अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी चोरट्याकडून २० दुचाकी जप्त केल्या. जप्त करण्यात आलेल्या दुचाकींची किंमत १५ लाख रुपये आहे. कोथरूड, उत्तमनगर, वारजे, भारती विद्यापीठ, सिंहगड रस्ता, बावधन, तसेच ग्रामीण पोलिसांच्या राजगड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरट्याने दुचाकी चोरल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. महेश हनुमानसिंग राजपूत असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी एका अल्पवयीनाला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी वाहतूक नियमभंग करणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. रस्त्यावरील उत्तमनगर परिसरात पोलिसांनी नाकाबंदी करुन दुचाकीस्वारांची तपासणी सुरू केली.

# संकष्टी चतुर्थीनिमित्त थेऊरला दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**थेऊर, ता. ६ :** विविध रंगीत फुलांनी सजलेले अष्टविनायक तीर्थक्षेत्रापैकी प्रख्यात धार्मिक स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या थेऊर (ता. हवेली) येथे संकष्टी चतुर्थीला श्री. चिंतामणी मंदिरात शुक्रवारी (ता. ०६) पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या.

चंदनाचा लेप लावलेल्या स्वयंभू मुर्तीला हारतुऱ्यांची सजावट, धुप अत्तराचा दरवळत असलेला सुंगध यातून 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात चिंतामणीच्या दर्शनासाठी हजारो भाविक दाखल झाले होते. फाल्गुन महिन्यातील संकष्टी चतुर्थी असल्याने पहाटेपासूनच भाविकांनी चिंतामणीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. पहाटे पुजारी राजेंद्र आगलावे यांच्या हस्ते श्रींची पूजा करण्यात आली. चिंचवड देवस्थानच्या वतीने श्री चिंतामणीची महापूजा करण्यात आली. देवस्थान तर्फे मंदिर प्रांगणात मांडव घालण्यात आले होते, दर्शनबारी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. उष्णतेमुळे भाविकांची गैरसोय नये म्हणून कूलर लावण्यात आले होते. दुपारी देवस्थान तर्फे भाविकांना उपवासाची खिचडी वाटण्यात आली.



दरम्यान, सायंकाळी चिंतामणी भजनी मंडळ यांचे साथीने ह.भ.प. ओंकार महाराज सावंत बीड यांचे सुभाष्य कीर्तन झाले, चंद्रोदयानंतर श्रींचा छबिना निघला त्यांनतर उपस्थित भाविकांना ग्रामस्थांतर्फे महाप्रसाद देण्यात आला. जास्त गर्दी होण्याची शक्यता असल्याने देवस्थान तर्फे जादा सुरक्षा व्यवस्था करण्यात केली होती. ग्रामपंचायती तर्फे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती.

# बारामतीत भिगवण रोडवरील प्रणव लॉजवर बारामती पोलिसांचा छापा

## पाच जण ताब्यात ; चार महिलांची सुटका

**बारामती, ता. ६ :** बारामती तालुका पोलिसांनी भिगवण रोडवरील प्रणव लॉज येथे छापा टाकत देहव्यापाराच्या अड्ड्यावर मोठी कारवाई केली. या कारवाईत पाच जणांना ताब्यात घेण्यात आले असून चार महिलांची सुटका करण्यात आली आहे. तसेच सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत पोलीस उपनिरीक्षक धनश्री भगत यांनी बारामती तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सोमनाथ महादेव खोमणे (रा. सावळ, ता. बारामती), धिरज रामभाऊ जाधव (रा. जालना), सागर संजय सोडबुके (रा. बारामती), मेराजुल जानीफ अली (रा. गोलपारा, आसाम), अफजल मझीबर रहमान हुसेन (रा. बरपेटा, आसाम) आणि सदाम जुमरुद्दीन हुसेन (रा. बरपेटा, आसाम) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवारी (ता. ०५) सायंकाळी भिगवण रोडवरील प्रणव लॉज येथे ही कारवाई करण्यात आली. आरोपींनी परराज्यातील महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेत असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. या व्यवसायातून मिळणाऱ्या पैशांवर आरोपी उपजीविका करत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या कारवाईत पोलिसांनी आसाम येथील तीन (वय ३०, २१, व २६) आणि पश्चिम बंगाल येथील एक (वय २२) अशा चार महिलांची सुटका केली आहे. दरम्यान, या प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १४३ तसेच स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत कलम ४ व ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव करीत आहेत.

# महिला दिनानिमित्त लोणी स्टेशन येथील यमुनाई हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**लोणी काळभोर, ता. ६ :** जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती व्हावी आणि ग्रामीण भागातील महिलांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने लोणी स्टेशन (ता. हवेली) येथील यमुनाई हॉस्पिटल व प्रसुतीगृह येथे रविवारी (ता. ८) विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात महिलांसाठी विविध आजारांवरील तपासणी, सल्ला व उपचार उपलब्ध करून दिले जाणार असून जास्तीत जास्त महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन हॉस्पिटलचे संचालक डॉ. संदिप चव्हाण व डॉ. प्रतिभा चव्हाण यांनी केले आहे.




जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेले हे शिबिर सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत होणार असून विशेषतः महिलांच्या आरोग्याशी संबंधित विविध तपासण्या व मार्गदर्शन या ठिकाणी दिले जाणार आहे. ग्रामीण व उपनगरी भागातील अनेक महिलांना वेळेअभावी किंवा आर्थिक कारणांमुळे वेळेवर तपासणी करून घेता येत नाही. या पार्श्वभूमीवर महिलांना मोफत तपासणी व तज्ज्ञ सल्ला मिळावा यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यमुनाई हॉस्पिटलचे संचालक डॉ. संदिप चव्हाण हे स्त्रीरोग व प्रसुती तज्ज्ञ असून महिलांच्या आरोग्याच्या क्षेत्रात त्यांना मोठा अनुभव आहे. तसेच डॉ. प्रतिभा चव्हाण या देखील स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन व उपचार देत आहेत. दोन्ही डॉक्टरांनी आतापर्यंत हजारो रुग्णांवर यशस्वी उपचार केले असून शेकडो शस्त्रक्रियांचा अनुभव त्यांच्या मागे आहे. महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी ते वेळोवेळी विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करत असतात. या शिबिरामध्ये महिलांना प्रसूतीपूर्व व प्रसुतीदरम्यानचे उपचार, जोखमीच्या गर्भावस्थेबाबत तपासणी व उपचार, तसेच वंध्यत्व निवारणाबाबत सल्ला व मार्गदर्शन दिले जाणार आहे. याशिवाय मासिक पाळीशी संबंधित समस्या, स्त्रीरोग विषयक आजार, तसेच इतर आरोग्य समस्यांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर हर्निया, अपेंडिक्स, मुळव्याध यांसारख्या शस्त्रक्रियांबाबतही तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन दिले जाणार आहे. महिलांनी वेळेवर तपासणी करून घेतल्यास अनेक गंभीर आजारांपासून बचाव होऊ शकतो, असे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान, हे शिबिर यमुनाई हॉस्पिटल, श्री विहार सोसायटीजवळ, हाडके (भारत पेट्रोल पंप) समोर, लोणी स्टेशन (ता. हवेली, जि. पुणे) येथे आयोजित करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी नागरिकांनी ८४५९९२४१०६ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच या शिबिराचा लाभ घेण्यासाठी महिलांनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहनही आयोजकांनी केले आहे.

### तपासण्यांवर ५० टक्के सवलत

या शिबिरात काही महत्त्वाच्या चाचण्या पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत. यात थायरॉईड, ब्लड शुगर आणि सीबीसी या रक्त तपासण्यांचा समावेश आहे. तसेच महिलांच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली पीएपी स्मिअर टेस्ट ही चाचणी केवळ ३०० रुपयांत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय इतर काही तपासण्यांवर ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त

### विष्णूदेव वर्मा महाराष्ट्राचे नवे राज्यपाल



**मुंबई, ता. ६ :** महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून विष्णूदेव वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विष्णूदेव वर्मा हे तेलंगणाचे राज्यपाल होते. ८ राज्यांमधील राज्यपाल बदलण्यात आले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नव्या नियुक्त्यांना मंजुरी दिली. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राचा अतिरिक्त प्रभार होता. पश्चिम बंगालची विधानसभा निवडणूक ऐन तोंडावर आलेली असताना सी. व्ही. आनंद बोस यांनी बंगालच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या जागी तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवि यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लडाखचे नायब राज्यपाल कवींद्र गुप्ता यांची हिमाचल प्रदेशचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शिवप्रताप शुक्ला हे तेलंगणा, ले. जन. सईद अता हसनैन (निवृत्त) हे बिहारचे, नंद किशोर यादव यांची नागालँडचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर, तरणजीत सिंग संधू यांची दिल्लीचे आणि विनयकुमार सक्सेना यांची लडाखचे नायब राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्याकडे तामिळनाडूचा प्रभार सोपवण्यात आला आहे.

### भोसरीत पूर्ववैमनस्यातून तरुणावर दगडफेक आणि मारहाण

**भोसरी, ता. ६ :** जुन्या भांडणाच्या कारणावरून एका टोळक्याने तरुणाला आणि त्याच्या मित्रांना बेदम मारहाण करत दगडफेक केल्याची घटना घडली आहे. ही घटना मंगळवारी सद्गुरूनगर, भोसरी येथे घडली.याप्रकरणी सतीश अर्जुन पाटील (भोसरी) यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी सुरज सुखदेव लष्करे, ऋषीकेश हरी लोहार, पार्थ वसंत खुने, सोहल जिलानी मुजावर आणि गोविंद लालु रूपवते या पाच आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचे मित्र गप्पा मारत थांबले असताना आरोपींनी तिथे येऊन एका मित्रासोबत असलेल्या जुन्या भांडणाचे कारण काढले. आरोपींनी बेकायदेशीर गर्दी जमवून शिवीगाळ करत फिर्यादी व त्यांच्या मित्रांना लाथाबुक्क्यांनी मारले. तसेच त्यांच्या दिशेने दगडफेक केली, ज्यामध्ये फिर्यादीच्या डोक्याला दगड लागून ते जखमी झाले. त्यांचा मित्र हॉटेलमध्ये जीव वाचवण्यासाठी पळाला असता आरोपींनी हॉटेलमधील खुर्च्या आणि पाण्याचे ग्लास फेकून मारून त्यालाही जखमी केले. भोसरी पोलीस तपास करत आहेत.

### पिंपरीत पोलिसात तक्रार दिल्याच्या कारणावरून व्यापाऱ्यास मारहाण

**पिंपरी, ता. ६ :** आमच्याविरुद्ध तक्रार का दिली, असा जाब विचारत तिघांनी मिळून एका व्यापाऱ्याला लोखंडी रॉडने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना शास्त्रीनगर, पिंपरी येथे घडली.याप्रकरणी राजबहादूर रामदास यादव (पिंपरी) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी स्वप्निल चंदनशिवे (पिंपरी) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आपल्या घरी जेवण करत असताना आरोपींनी त्यांच्या घराचा दरवाजा वाजवला. फिर्यादी बाहेर आले असता आरोपींनी त्यांच्याविरुद्ध तक्रार केल्याचा राग धरून त्यांना शिवीगाळ केली. यावेळी एका आरोपीने हाताने मारहाण केली, तर इतर दोन आरोपींनी लोखंडी रॉडने फिर्यादीच्या कपाळावर आणि नाकावर मारून गंभीर जखमी केले. तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. पिंपरी पोलीस तपास करत आहेत.

### गुटखा विक्री प्रकरणी एकास अटक

**वाकड, ता. ६ :** शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा आणि सुगंधित तंबाखूची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या एका दुकानदारावर पोलिसांनी कारवाई केली आहे. ही कारवाई बुधवारी ( मार्च भुजबळवस्ती, वाकड येथे करण्यात आली.अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस कॉन्स्टेबल मितेश यादव यांनी याप्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी प्रताप गेपरराम देवासी (३१, वाकड) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शासनाने आरोग्यास घातक असलेल्या तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी घातली आहे. असे असतानाही आरोपीने आपल्या स्वतःच्या फायद्यासाठी श्री धनलक्ष्मी ट्रेडर्स दुकानात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला विक्रीसाठी ठेवला होता. पोलिसांनी धाड टाकून १४ हजार ८४२ रुपये किमतीचा विविध कंपन्यांचा गुटखा जप्त केला आहे. हिंजवडी पोलीस तपास करत आहेत.

### नात्यातील मुलीबरोबर प्रेमसंबंध, पती-पत्नीत वाद, पत्नीवर दगडाने हल्ला

**तळेगाव, ता. ६ :** नात्यातील मुलीसोबत असलेल्या प्रेमसंबंधामुळे पती-पत्नीमध्ये झालेल्या वादातून पतीने पत्नीवर दगडाने जीवघेणा हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना सुदवडी मावळ येथे घडली. पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे. याबाबत २२ वर्षीय पत्नीने तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पतीचे त्याच्या नात्यातील एका मुलीसोबत प्रेमसंबंध असल्याच्या कारणावरून पती-पत्नीमध्ये वाद झाला. तू इथून निघून जा, मला तुझ्यासोबत राहायचे नाही असे म्हणत पतीने फिर्यादीला धमकावले. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीनेमी तुला आज जिवंत सोडणार नाही असे म्हणत फिर्यादीला जमिनीवर ढकलून दिले. त्यानंतर बाजूला पडलेला दगड हातात घेऊन फिर्यादीच्या डोक्यात आणि गालावर तीन ते चार वेळा जोराने मारून त्यांना गंभीर जखमी केले.

# अजित पवार अपघात प्रकरणात व्ही. के. सिंग यांच्यावर रोहित पवारांचे गंभीर आरोप

**बारामती, ता. ६ :** २८ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघात झाला होता. त्या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर या अपघातामागे कुणाचे तरी मोठे षडयंत्र असल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला होता. यासाठी त्यांनी गेल्या काही दिवसांपासून पत्रकार परिषदाही घेतल्या आहेत. तसेच त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून, तपासासाठी सीआयडीकडे काही कागदपत्रेही दिली आहेत.

यानंतर सीआयडीने व्हीएसआर कंपनीचे प्रमुख व्ही. के. सिंग यांना पुण्यात गुरुवारी चौकशीसाठी बोलावले होते. या चौकशीदरम्यान सिंग यांना सीआयडी पोलिसांनी व्हीआयपी ट्रिटमेंट दिल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे. तसेच त्यांना संध्याकाळी काही वेळ क्रिकेट सामना पाहण्याचीही मुभा देण्यात आली, असेही पवार म्हणाले आहेत.

या प्रकरणातील चौकशीबाबत रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, अजितदादांच्या दुर्दैवी मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अनेकांपैकी एक कारण असलेला व्हीएसआर कंपनीचा मालक व्ही. के. सिंग याला सीआयडीने चौकशीसाठी बोलावले होते की शाही पाहुणचारासाठी, याबाबत आता शंका निर्माण झाली आहे.

सकाळी ११ वाजता आल्यानंतर त्याची आठ तास चौकशी केल्याचे



सांगण्यात आले, पण प्रत्यक्षात बहुतांश वेळ त्याची बडदास्त ठेवण्यात आणि पाहुणचार करण्यातच गेला. रात्री तर काळ्या काचा लावलेल्या पोलिसांच्या गाडीतून पाहुण्याप्रमाणे त्याची पाठवणी करण्यात आली. यामागे नेमके काय सुरू आहे? काळे कारनामे करणाऱ्याला अशा काळ्या काचा असलेल्या गाडीतून का सोडण्यात आले? मात्र कितीही काळे पडदे टाकण्याचा प्रयत्न केला तरी या प्रकरणात सत्याचा सूर्य उगवल्याशिवाय राहणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

**सत्ताधारी आमदार जागे होतील का?**

पुढे पवार म्हणाले, एकीकडे आमचा हक्क असूनही या अपघाताबाबत एफआयआरही नोंदवून घेतला जात नाही, पण दुसरीकडे ज्याच्या विमानामुळे अजितदादांना आपण गमावले त्या व्ही. के. सिंग यांना मात्र कुणाच्या आशीर्वादाने व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जाते? याबाबत वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांनाही पोलिसांकडून अत्यंत चुकीची वागणूक दिली जाते. अशा परिस्थितीत तरी अजितदादांसोबत काम केलेले आणि त्यांचे विश्वासू सत्ताधारी आमदार जागे होतील का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

**व्ही. के. सिंग यांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू**

तसेच रोहित पवार पुढे म्हणाले, आम्ही संध्याकाळी चार वाजता सीआयडी कार्यालयात जाणार आहोत. या अपघातप्रकरणी एफआयआर दाखल करणार आहात की नाही, हे विचारणार आहोत. या प्रकरणाची चौकशी योग्य पद्धतीने होत नाही. सत्तेत असताना देखील अजितदादांना न्याय देता येत नाही, असेही पवार म्हणाले. व्ही. के. सिंग यांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यांच्या पाठीमागे कुणाचा तरी हात आहे. अनेकांचा पैसा त्यांच्या कंपनीत गुंतलेला असल्यामुळे त्यांना वाचवले जात आहे. त्या लोकांना अजितदादांना न्याय देता येत नाही, ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. दादांच्या बाबतीत जे घडले ते इतर कुणाच्या बाबतीत घडू नये, यासाठी मी लढत आहे, असे रोहित पवार म्हणाले.

# रांजणगाव एमआयडीसीतील अनधिकृत अतिक्रमणावर प्रशासनाचा हातोडा

**पोपट पाचंगे**

रांजणगाव गणपती, ता. ०५ : पंचतारांकित रांजणगाव औद्योगिक वसाहत, ता. शिरूर येथील एम आयडीसीच्या मालकीच्या भूखंडावर करण्यात आलेल्या अनधिकृत अतिक्रमणावर प्रशासनाने अखेर हातोडा फिरविला. या कारवाईचे स्थानिक नागरिकांनी स्वागत करत मोकळा श्वास सोडला.

एमआयडीसीचे प्रवेशद्वार असलेल्या यश इन चौकाजवळील गोवा वाईन्स शेजारी, परंतु एमआयडीसीच्या मालकीच्या असलेल्या भूखंड क्र. -१२२ मधील राहण्यासाठीचे पत्र्याचे शेड, टपऱ्या व इतर अनधिकृत बांधकामांवर जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल



प्रशासन व रांजणगाव एमआयडीसी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही धडक कारवाई करण्यात आली.

यावेळी नायब तहसीलदार सुवर्णा खरमाटे, एमआयडीसी प्रादेशिक कार्यालयाच्या एरिया मॅनेजर राजश्री देशमुख, सर्व्हेअर शबाना मुल्ला, रांजणगाव एमआयडीसीचे प्रभारी उपअभियंता नितेश रेबडे, सहाय्यक अभियंता भूषण ठाणगे, अग्निशमन केंद्राचे अग्निशमन अधिकारी पी. व्ही. गुंड, पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे, शिरूरचे मंडलाधिकारी सतीश पंचरास, कारेगावचे तलाठी दीपक गांगर्डे आदींसह एमआयडीसीचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी रांजणगावचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

येथील एमआयडीसीमधील विविध कंपन्यांमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारे संपत येवले यांनी एमआयडीसीच्या तत्कालीन अधिकाऱ्यांच्या आश्रयामुळे हे अतिक्रमण केल्याची चर्चा होती. येवले यांना हे अतिक्रमण हटविताना वारंवार अभय मिळत होते. परंतु -१२२ हा जवळपास चार एकर क्षेत्रफळाचा भूखंड असून, गेल्या १२-१३ वर्षांपासून येवले हे सहकुटुंब येथे राहत होते. त्यांनी येथे असलेल्या सहा ते सात टपऱ्यांमधून विविध छोटे-मोठे व्यवसाय सुरू केले होते. तसेच एक मोठे अनधिकृत पत्र्याचे बांधकाम केलेले शेड त्यांनी एका व्यावसायिकाला भाड्याने दिले होते. अखेर आज हे सर्व अतिक्रमण दोन जेसीबीच्या सहाय्याने पाडण्यात आले.

### बालेवाडीत पोलिसांना शिवीगाळ करणाऱ्या तरुण–तरुणीवर गुन्हा दाखल

**पुणे, ता. ६ :** बालेवाडी येथील एका बारमध्ये झालेल्या वादानंतर पोलिसांशी वाद घालून गोंधळ घालणाऱ्या तरुण-तरुणीवर बाणेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांचे कर्तव्य बजावत असताना अडथळा निर्माण करणे, शिवीगाळ करणे आणि महिला पोलिस अधिकाऱ्याच्या हाताला चावा घेऊन जखमी केल्याचा आरोप या दोघांवर आहे.

मानसी चंपालाल परिहार ( २४, रा. पिंपळे सौदागर) आणि युवराज निलेश परतानी ( २४, रा. पाषाण) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तीन मार्च रोजी रात्री सुमारे पाऊणे बारा वाजता बालेवाडी येथील एजंट जॅक्स बारमध्ये भांडण झाल्याची माहिती बाणेर पोलिसांना मिळाली.

त्यानंतर महिला पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया मांढरे व इतर पोलिस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी बारमध्ये एक तरुण व एक तरुणी मोठ्याने आरडाओरडा करत असल्याचे पोलिसांना आढळले. त्या दोघांनी बारमध्ये मारहाण झाल्याचा दावा करत सीसीटीव्ही फुटेज तात्काळ देण्याची मागणी केली. मात्र बार व्यवस्थापकाने फुटेजचे नियंत्रण मुंबईमध्ये असल्याने ते दुसऱ्या दिवशी उपलब्ध करून देऊ असे सांगितले. यानंतर संबंधित तरुण-तरुणी संतप्त झाले आणि पोलिसांशी वाद घालू लागले. नंतर हे दोघे बाणेर पोलिस ठाण्यात आले आणि तेथेही गोंधळ घातला. पोलिसांनी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला असतानाही त्यांनी ऐकले नाही.

# शिवज्योत घेऊन धावणाऱ्या दोन शिवभक्तांचा अपघाती मृत्यू

**मावळ, ता. ६ :** पुणे - शिवजयंतीच्या दिवशी मावळ तालुक्यातील शिवभक्तांवर दुर्दैवी काळाने घाला घातला. शिवज्योत घेऊन गावाकडे परतणाऱ्या दोन शिवभक्तांचा भीषण अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण आंदर मावळ परिसरात शोककळा पसरली आहे. ओंकार दत्ता आरडे आणि दर्शन बाळू शिंदे असे मृत्यू झालेल्या शिवभक्तांची नावे आहेत. हे दोघेही मावळ तालुक्यातील शिंदेवाडी येथील रहिवासी होते.

याप्रकरणी अधिक माहिती अशी की, ओंकार आणि दर्शन शिवजयंतीनिमित्त विसापूर किल्ल्यावरून शिवज्योत घेऊन मोठ्या उत्साहात गावाकडे परतत होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवभक्तांनी पारंपरिक पद्धतीने किल्ल्यावरून



शिवज्योत आणण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील नायगाव परिसरात हे शिवभक्त मध्यरात्रीच्या सुमारास, सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास पोहोचले होते. त्यावेळी ते शिवज्योत घेऊन धावत असतानाच विरुद्ध दिशेने येणारी एक कार अचानक दुभाजक ओलांडून त्यांच्या दिशेने आली. कारचालकाने बेदरकारपणे वाहन चालवत या दोघांना जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत ओंकार आरडे आणि दर्शन शिंदे यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की दोघांनाही गंभीर दुखापती झाल्या आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या दुर्दैवी घटनेमुळे शिंदेवाडी तसेच आंदर मावळ परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. शिवजयंतीच्या दिवशीच दोन तरुण शिवभक्तांचा मृत्यू झाल्याने गावात शोककळा पसरली आहे.

# अनुदान मंजुरीसाठी लाच मागितल्याप्रकरणी दोन अधिकाऱ्यांवर कारवाई

**पुणे, ता. ६ :** मागासवर्गीय तरुणांना व्यवसायासाठी बळ देणाऱ्या महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळातच भ्रष्टाचाराची वाळवी लागल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. केवळ ५० हजार रुपयांचे सरकारी अनुदान मिळवून देण्यासाठी १५ हजारांची लाच मागणाऱ्या जिल्हा व्यवस्थापकासह सहाय्यक लेखा अधिकाऱ्याला पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. गुरुवारी रात्री रस्ता पेठेतील 'पुणे कॅफे'समोर हा सापळा रचून कारवाई करण्यात आली होती.



पुण्यातील एका तरुण फोटोग्राफरने आपला व्यवसाय वाढवण्यासाठी लाख रुपयांचा कॅमेरा खरेदी केला होता. त्यासाठी त्याने बँकेकडून कर्ज घेतले होते. सरकारी योजनेनुसार, व्यवसायांसाठी ५० हजार रुपयांचे अनुदान मिळते. हेच अनुदान मिळवण्यासाठी तरुणाने सप्टेंबर २०२५ मध्ये महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाकडे रीतसर अर्ज केला होता.

महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक महेंद्र माने आणि सहाय्यक लेखा अधिकारी संतोष शिंदे या दोघांनी तरुणाच्या अर्जावर स्वाक्षरी करण्यासाठी २० हजार रुपयांची मागणी केली. 'साईट व्हिजिट' करणे आणि फाईल विभागीय कार्यालयात पाठवणे हे त्यांचे कर्तव्य असताना, त्यांनी त्यासाठी चक्क लाच मागितली. तडजोडीअंती १५ हजार रुपये देण्याचे ठरले. दरम्यान,फोटोग्राफरने लाच न देण्याचे ठरवत थेट 'ACB' कडे धाव घेतली. गुरुवारी संध्याकाळी सातच्या सुमारास, रस्ता पेठेतील पुणे कॅफेसमोर संतोष शिंदे याने लाचेचे १५ हजार रुपये स्वीकारले. दबा धरून बसलेल्या पोलिसांनी त्याला जागीच पकडले. यानंतर मुख्य सूत्रधार महेंद्र माने यांनाही त्याच्या घरातून ताब्यात घेण्यात आले आहे.

### तरुणीच्या नावाने इन्टाग्राम अकाऊंटद्वारे बदनामी करणाऱ्यास पोलिसांनी केले जेरबंद

**पुणे, ता. ६ :** डिजिटल युगात मैत्री करणे जितके सोपे झाले आहे, तितकेच ते धोक्याचेही ठरत आहे. पुण्यातून एक अत्यंत संतापजनक प्रकार समोर आला आहे. सोशल मीडियावर मैत्री करायचा आणि तरुणीने लग्नाला किंवा प्रेमाला नकार दिला की तिचे 'फेक प्रोफाईल' बनवून तिचे फोटो 'कॉलगर्ल' असल्याचे भासवून व्हायरल करायचा, असा अघोरी उद्योग करणाऱ्या रमेश सुरेश म्हात्रे (४०) याला शिवाजीनगर पोलिसांनी विरारमधून बेड्या ठोकल्या आहेत.

मूळचा ठाण्याचा असलेला रमेश म्हात्रे हा तरुणींशी ओळख वाढली की तो लग्नासाठी तगादा लावायचा. जर एखाद्या मुलीने त्याला नकार दिला, तर त्याला राग यायचा. तो संबंधित मुलीच्या नावाने फेसबुक किंवा इन्स्टाग्रामवर बनावट खाते उघडायचा. धक्कादायक बाब म्हणजे, तो या तरुणी 'कॉलगर्ल' असल्याचा भास निर्माण करणारे फोटो आणि



मजकर पोस्ट करायचा. यामुळे त्या मुलींना अनोळखी नंबरवरून अश्लील फोन आणि मेसेज येऊ लागायचे.

तपासात समोर आले की, आरोपीने स्वतःच्या वहिनीसोबतही असाच प्रकार केला होता, ज्यामुळे त्याच्या भावाने त्याला घरातून हाकलून दिले होते. तो वेटर आणि सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करत असताना फावल्या वेळेत हे विकृत काम करायचा.

# तक्ष्य राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत विटाच्या आदर्श कॉलेजचा डंका; विद्यार्थ्यांनी पटकावला प्रथम क्रमांक

**विटा, ता. ५ :** विटा येथील आदर्श कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील तक्ष्य नृत्य स्पर्धेत ग्रुप डान्स प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. देशभरातील विविध महाविद्यालयांमधून आलेल्या संघांमध्ये झालेल्या चुरशीच्या स्पर्धेत आदर्श कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत हा मान पटकावला.

ही स्पर्धा आदर्श ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स यांच्या वतीने विटा येथे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आली होती. देशातील विविध राज्यांतील महाविद्यालयांमधून आलेल्या स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. एकूण १५ महाविद्यालयांनी आपल्या कला, सर्जनशीलता आणि सांघिक एकतेचे उत्कृष्ट दर्शन घडवत प्रेक्षकांची मने जिंकली.

या स्पर्धेत अक्षया पाटील व त्यांच्या समूहाने तसेच साक्षी मनगुटे आणि श्रुती मनगुटे यांनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने परीक्षक आणि प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. आकर्षक संकल्पना, नेत्रदीपक वेशभूषा, अचूक ताल-लय आणि प्रभावी अभिव्यक्ती यामुळे त्यांच्या सादरीकरणाला विशेष दाद मिळाली.

स्पर्धेच्या अंतिम फेरीत विविध राज्यांतील संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. प्रत्येक सादरीकरणात नावीन्य आणि सर्जनशीलतेचा संगम दिसून येत




होता. अशा स्पर्धात्मक वातावरणात आदर्श कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण, एकसंध हालचाली आणि उत्कृष्ट टीमवर्कच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या नृत्यात भारतीय संस्कृतीची झलक आणि आधुनिक नृत्यशैलीचा सुंदर संगम पाहायला मिळाला. विजेत्या संघाला ५ हजारांचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पारितोषिक वितरण सोहळा अत्यंत दिमाखात पार पडला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. महाजन, सांस्कृतिक समन्वयक डॉ. स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. सरावासाठी दिलेल्या सुविधा, वेळोवेळी केलेले मार्गदर्शन आणि प्रोत्साहन यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. संस्थेचे कार्यकारी संचालक पी. टी. पाटील तसेच कॅम्पस संचालिका पूजा पाटील यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निमाण करावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, माजी आमदार सदाशिवराव पाटील तसेच अध्यक्ष वैभव (दादा) पाटील यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास असून कला व संस्कृतीच्या माध्यमातून आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित होते, असे सांगितले.

दरम्यान, या यशानंतर महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन करत जल्लोष साजरा केला. आदर्श कॉलेज ऑफ फार्मसी, विटा येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवली असून भविष्यात आणखी मोठ्या यशाची ही नांदी ठरणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.



## अभिनेत्री श्रेया बुगडे यांना यावर्षीचा राम नगरकर कलागौरव पुरस्कार जाहीर

**नगर, ता. ६ :** नगरकर कलागौरव पुरस्कार यावर्षी सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रेया बुगडे यांना जाहीर झाला आहे. ख्यातनाम विनोदी अभिनेते राम नगरकर यांच्या स्मृती प्रीत्यर्थ दरवर्षी सदर पुरस्कार प्रदान करण्यात येतो. रुपये अकरा हजार रोख व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्काराचे हे सहावे वर्ष असून येत्या शनिवारी (ता. १४ मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजता टिळक रस्त्यावरील टिळक स्मारक मंदिर येथे होणाऱ्या एका विशेष कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेत्री वंदना गुप्ते यांच्या हस्ते श्रेया बुगडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल, असे राम नगरकर यांच्या स्नुषा डॉ. वैजयंती वंदन नगरकर आणि बेलवलकर सांस्कृतिक मंचचे संस्थापक समीर बेलवलकर यांनी कळवले आहे.

दरम्यान, पुरस्कार वितरण सम ारंभानंतर सुप्रसिद्ध निवेदक राजेश दामले हे श्रेया बुगडे यांची प्रकट मुलाखत घेतील.

# उत्तर प्रदेशातील चोरट्यांच्या टोळीला विश्रामबाग पोलिसांनी केली अटक; ६२ लाख रुपयांचा ऐवज जप्त

**पुणे, ता. ६ :** शहरात घरफोडीचे गुन्हे करणाऱ्या उत्तर प्रदेशातील चोरट्यांच्या टोळीला विश्रामबाग पोलिसांनी अटक केली. चोरट्यांनी शहरात घरफोडीचे सहा गुन्हे केल्याचे उघडकीस आले असून, त्यांच्याकडून ६२ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. आकाश सुभाष (वय २३,रा. दिल्ली. मूळ रा. मेरठ, उत्तर प्रदेश) साथीदार जितेंद्र चर्तुवेदी (वय ३२, रा. दिल्ली) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत.




आरोपींनी विश्रामबाग, समर्थ, खडक, भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीचे पाच गुन्हे केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. शहरात घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. बंद सदनिकांची पाहणी करुन चोरट्यांनी घरफोडीचे गुन्हे केले होते. शहराच्या मध्य भगात घरफोडीची घटना घडली होती. या गुन्ह्याचा विश्रामबाग पोलिसांकडून तपास करण्यात येत होता. पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले.

चोरटे पुणे स्टेशन परिसरात असल्याची माहिती मिळाली. चोरटे पुणे स्टेशन परिसरातील एका लॉजम ध्ये वास्तव्यास होते. तेथून ते रेल्वेने उत्तर प्रदेशात गेल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर चोरटे पुन्हा शहरात आल्याची माहिती पोलीस कर्मचारी आशिष खरात आणि अनिस शेख यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून दोघांना पकडले, अशी माहिती परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कशीत आरोपींनी शहरात घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून ६२ लाख रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले, सहायक आयुक्त चंद्रकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप कसबे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरूण घोडके, सहायक निरीक्षक राजेश उसगावकर, पोलिस कर्मचारी सचिन कदम, गणेश काठे, अमोल भोसले, शैलेश सुर्वे, सचिन अहिवळे, कैलास डुकरे, आशिष खरात, जाकीर मणियार, राहुल मोरे, अनिस शेख, शिवदत्त गायकवाड, सागर मोरे, अर्जुन थोरात, नितीन बाबर, अर्जुन कुडाळकर यांनी ही कामगिरी केली.

### उत्तर प्रदेशातील गुन्हेगारी टोळीशी संबंध

आकाश सुभाष हा सराइत आहे. उत्तर प्रदेशातील सनी गँग या टोळीसाठी तो काम करतो. उत्तर प्रदेश पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यात येत होता. तो दिल्लीत वास्तव्यास होता. दिल्लीहून पुण्यात येऊन तो घरफोडीचे गुन्हे करायचे. पुणे स्टेशन परिसरातील लॉजमध्ये आकाश आणि त्याचा साथीदार जितेद्र चर्तुवेदी हे वास्तव्य करायचे. घरफोडीचा गुन्हा केल्यानंतर ते उत्तर प्रदेशात पसार व्हायचे.

**वेशांतर करुन चोरट्यांचा माग**

शहरा घरफोडी केल्यानंतर चोरटे उत्तर प्रदेशात पसार झाले होते. पोलिसांचे पथक उत्तर प्रदेशात पोहोचले. मेरठमधील नयी वस्ती भागात चोरटे वास्तव्यास होते. वेशांतर करुन सहायक पोलीस निरीक्षक राजेश उसगावकर आणि पोलिसांचे पथक चोरट्यांचा मागावर होते. त्यानंतर आरोपी पुन्हा पुण्यात गेल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांचे पथक परतले. शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिर परिसरात पोलिसांनी सापळा लावून चोरट्यांना पकडले.

## कोंबड्यांचा कुजका कचरा टाकताना दोन परप्रांतीय रंगेहाथ पकडले; ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे प्रकार उघड

**यवत, ता. ६ :** खुटबावयवत सार्वजनिक रस्त्याच्या कडेला कोंबड्यांचा कुजका कचरा टाकून आरोग्य धोक्यात आणणाऱ्या दोन परप्रांतीय इसमांविरोधात यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला. खुटबाव (ता. दौंड) ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक रस्त्याच्या कडेला बुधवारी (ता. ४) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास हि घटना उघडकीस आली.

प्रोशांता मनिद्रनाथ देय (वय ५८), व राहुल हजरापोदो सरदार (वय २०) रा. दोघे सद्या रा. येळे वस्ती, देलवडी ता. दौंड), मुळ रा. बेलडेना तळशीबागांन मचलागपर उत्तर परगांना पश्चिम बंगाल) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोघांची




नावे आहेत. याप्रकरणी यवत पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार परशुराम किसन काळेल यांनी यवत पोलीस ठाण्यात सरकारतर्फेफिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी (ता. ०४) संध्याकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास डायल ११२ वर खुटबाव येथील पोलीस पाटील पूनम नरेश चव्हाण यांनी फोन करून माहिती दिली की, गायराण मोहरी येथील पवार वस्ती जवळ खुटबावयवत सार्वजनिक रस्त्याच्या कडेला दोन अनोळखी इसम तीनचाकी टमटममधून कोंबड्यांचा घाण कचरा टाकत आहेत. ग्रामस्थांनी त्यांना रोखून धरले आणि पोलिसांच्या मदतीची मागणी केली.

सदरची माहिती मिळताच यवत पोलीस ठाण्याचे पोलीस अंम लदार परशुराम काळेल व पोलीस हवालदार ए. एम. काळे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी पोलीस पाटील पूनम चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ निखिल थोरात, प्रमोद पासलकर, दीपक नेटके, सुधीर थोरात व इतर नागरिकांनी दोन इसमांना पकडून ठेवले होते. पोलिसांनी टमटम ची तपासणी केली असता वाहनाच्या मागील हौदात गोण्या भरून कोंबड्यांची कातडी, पिसे आणि कुजरा कचरा आढळून आला. या कचऱ्याला पाणी सुटून तीव्र दुर्गंधी पसरली होती. काही कचरा रस्त्याच्या कडेलाही टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले.

दरम्यान, यवत पोलीस ठाण्यातील पोलिसांनी दोन्ही इसमांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी नावे प्रोशांता देय व राहुल सरदार अशी सांगितली. या प्रकरणी यवत पोलीस ठाण्यात भा.न्या. सं. कलम २७१, २९२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास यवत पोलीस करत आहेत.

## भिगवण पोलिसांकडून वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. ६ : शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांविरोधात पोलिसांनी धडक मोहीम राबवत मोठ्या प्रमाणात कारवाई केली. मॉडिफाईड सायलेन्सर, दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास तसेच चारचाकी वाहनांवर नियमबाह्य रंगीत काचा लावणाऱ्या वाहनचालकांना पोलिसांनी चांगलाच दणका दिला.

शहरात अशा प्रकारच्या वाहनां मुळे नागरिकांना मोठा त्रास होत असल्याबाबत पुणे प्राईम न्यूज मध्ये बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर भिगवण पोलिसांनी तात्काळ कारवाई करत विशेष तपासणी मोहीम सुरू केली. शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ




तसेच कॉलेज परिसरात पोलिसांनी नाकाबंदी करून संशयित वाहनांची तपासणी केली.

या कारवाईदरम्यान मॉडिफाईड बुलेट सायलेन्सर वापरणारी वाहने, दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास करणारे तसेच चारचाकी वाहनांवर नियमबाह्य रंगीत काचा लावलेली वाहने आढळून आल्याने संबंधित वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. अचानक झालेल्या या कारवाईमुळे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांमध्ये एकच खळबळ उडाली. या मोहिमेत भिगवण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे, पीएसआय पाटील, पीएसआय वारगड, हवालदार पवार, पोलीस अंमलदार करचे, पोलीस हवालदार लोडी, पोलीस हवालदार करचे, महिला पोलीस हवालदार भोंग तसेच होमगार्ड यांनी सहभाग घेतला.

> भिगवण शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर पोलिसांची कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. मॉडिफाईड सायलेन्सर वापरणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई केली जाईल. तसेच अल्पवयीन मुलांच्या हाती दुचाकीची चावी देणाऱ्या पालकांवरही यापुढे कायदेशीर कारवाई केली जाईल.
> - **विनोद महांगडे** (सहाय्यक पोलीस निरीक्षक, भिगवण पोलीस ठाणे)




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

## प्राईम लाईफ



## नारळ पाणी की उसाचा रस उन्हाळ्यात काय प्यायला हवे

नारळाच्या पाण्याला उन्हाळ्यातील सुपर ड्रिंक म्हटले जाते, परंतु त्याची किंमत जास्त असल्याने लोक ते पिणे टाळतात. त्याऐवजी, ते १० रुपयांना उसाचा रस पिऊन शरीराला हायड्रेट ठेवण्याचा प्रयत्न करतात. पण जेव्हा स्वच्छतेचा विचार येतो तेव्हा उसाच्या रसापासून दूर राहणे चांगले. बहुतेक लोक उष्णतेवर मात करण्यासाठी स्वस्त उसाचा रस पसंत करतात.

एखाद्याला वारंवार उच्च रक्तदाबाचा त्रास होत असेल तर त्याने नारळाचे पाणी प्यावे. त्यात असलेले पोटॅशियम शरीरातून अतिरिक्त सोडियम काढून टाकण्यास मदत करते. त्यात मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि मँगनीज सारखे आवश्यक घटक देखील असतात. हे इलेक्ट्रोलाइट्सचा समृद्ध स्रोत आहे जे सर्व ऋतूंमध्ये शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. उन्हाळ्यात ते पिणे हायड्रेशनसाठी आदर्श आहे.

नारळाचे पाणी चरबीमुक्त असते आणि त्यात व्हिटॅमिन सी असते, जे एक अँटिऑक्सिडंट असते जे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. एखाद्याला वारंवार कमी रक्तदाबाचा त्रास होत असेल तर त्यांनी तज्ञांचा सल्ला घेतल्यानंतरच नारळाचे पाणी प्यावे.

उसाचा रस हा उन्हाळी सुपर ड्रिंक म्हणून देखील ओळखला जातो. मधुमेह नसलेल्यांसाठी हे अत्यंत फायदेशीर आहे कारण त्यातील नैसर्गिक साखर, ग्लुकोज आणि फ्रुक्टोज त्वरित ऊर्जा प्रदान करतात. त्यात कॅल्शियम, पोटॅशियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि जीवनसत्त्वे अ, बी-कॉम्प्लेक्स आणि सी यासह अनेक अँटीऑक्सिडंट्स असतात.

नारळाच्या पाण्यात पोटॅशियम, सोडियम आणि मॅग्नेशियम असते, जे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्स संतुलित करण्यास मदत करते. घाम येणे इलेक्ट्रोलाइट संतुलन बिघडवते आणि नारळाचे पाणी हे संतुलन पुनर्संचयित करण्यास मदत करू शकते. दुसरीकडे, उसाच्या रसात अनेक खनिजे असतात पण इलेक्ट्रोलाइट्स नसतात. नारळ पाणी हे हायड्रेशनसाठी सर्वोत्तम आहे.

उसाच्या रसात नैसर्गिक साखरेचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे त्वरित ऊर्जा मिळते परंतु रक्तातील ग्लुकोजची पातळी देखील वाढते. नारळ पाण्यात साखर देखील असते, परंतु कमी प्रमाणात. हायड्रेटेड राहून नैसर्गिक साखरेचे सेवन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी नारळ पाणी सर्वोत्तम आहे. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी, कॅलरीजच्या सेवनाकडे लक्ष दिले पाहिजे. उसाच्या रसात भरपूर नैसर्गिक साखर असते, ज्यामुळे कॅलरीजचे प्रमाण जास्त होऊ शकते. वजन व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करणाऱ्यांसाठी, नारळ पाणी पिणे हा एक चांगला पर्याय आहे.

# तक्रारवाडीतील श्री पिरसाहेब महाराज यात्रेची जय्यत तयारी

### ९ ते ११ मार्च दरम्यान धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसह हजेरी व कुस्ती स्पर्धांचा जल्लोष

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. ६ : तक्रारवाडी (ता. इंदापूर) येथील जागृत देवस्थान श्री राजाबाग सवार पिरसाहेब महाराज यांच्या यात्रा उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून सोमवारी (ता. ०९) ते बुधवारी (ता. ११) हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या पिरसाहेबांच्या यात्रेत हिंदू-मुस्लिम बांधव एकत्र येत असल्याने हा सोहळा सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे प्रतीक ठरत आहे.



यात्रेनिमित्त ७ ते ९ मार्च या कालावधीत ग्रंथराज नवनाथ ग्रंथ पारायण आयोजित करण्यात आले आहे. सोमवारी (ता. ९) सायंकाळी सहा वाजता भाविकांसाठी महाप्रसाद आयोजित करण्यात आला असून रात्री ८ ते १० या वेळेत वाद्यांच्या गजरात पारंपरिक संदल सोहळा पार पडणार आहे. यावेळी पिरसाहेबांना फुलांची चादर अर्पण करून मलिदाचा नैवेद्य दाखवला जाणार आहे.

मंगळवारी (ता. १०) रात्री १० ते १२ या वेळेत फटाक्यांची आतषबाजी व छबिना होणार असून त्यानंतर रात्री १२ पासून कै. तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे मांजरवाडीकर लोकनाट्य तमाशा मंडळाचा रंगतदार कार्यक्रम सादर होणार आहे. या कार्यक्रमासाठी तमाशा रसिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. बुधवारी (ता. ११) सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पारंपरिक हजेरीचा कार्यक्रम होणार असून गावासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. श्रद्धेने नवस फेडण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. सायंकाळी ४ ते ७ या वेळेत निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान रंगणार आहे. प्रथम क्रमांकासाठी ५१ हजार द्वितीय ४१ हजार, तर इतर गटांसाठी ३१ हजार, २१ हजार, व १५ हजार अशी रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. त्यानंतर रात्री ९ वाजल्यापासून महिलांसाठी ऑर्केस्ट्रा स्वर संगम हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

दरम्यान, यात्रेनिमित्त ग्रामपंचायत व यात्रा कमिटीच्या वतीने स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाश व्यवस्था आणि सुरक्षेची विशेष व्यवस्था करण्यात आली असून प्रशासनाशी समन्वय साधून संपूर्ण नियोजन केले आहे.

> श्री पिरसाहेब महाराजांची यात्रा ही आपल्या गावाच्या सामाजिक ऐक्याची आणि हिंदू-मुस्लिम बंधुभावाची परंपरा जपणारी आहे. ज्येष्ठांचा आशीर्वाद आणि तरुणांचा उत्साह यामुळे हा सोहळा अधिक भव्य होत आहे. ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छता, पाणी, प्रकाश व सुरक्षेची सर्व व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यात्रा उत्सव शांततेत व उत्साहात यशस्वी करावा.
> - **शरद वाघ,** (सरपंच, तक्रारवाडी, इंदापूर)

## शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या बहाण्याने ११ लाखांचा गंडा

**पिंपरी, ता. ६ :** जादा परताव्याचे आमिष दाखवून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करायला लावून तीन जणांची ११ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे. ही घटना एप्रिल २०२३ ते मार्च २०२६ दरम्यान नवी सांगवी येथे घडली. या प्रकरणात तरुणाने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीसह दोघांना एका कंपनीत गुंतवणूक केल्यास दरमहा १० ते २० टक्के नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. या आमिषाला बळी पडून फिर्यादीने २.५० लाख, दुसऱ्याने पाच लाख आणि आणखी एकाने दोन लाख रुपये गुंतवले. आरोपीने एक वर्षानंतर मुद्दल परत करण्याचे लेखी करार करून देखील पैसे परत न देता एकूण ११ लाख रुपयांची फसवणूक केली. सांगवी पोलीस तपास करत आहेत.

# बारामती व राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुका मार्च महिन्यात होण्याची शक्यता?

**मुंबई, ता. ६ :** महाराष्ट्रातील दोन विधानसभेच्या जागा रिक्त आहेत. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे बारामती विधानसभेची जागा रिक्त आहे, तर अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभेचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळी ही जागा रिक्त आहे. या दोन्ही जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. येत्या काही दिवसांत पाच राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. याचवेळी बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणुकीची घोषणा होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, पोटनिवडणुकीची घोषणा मार्च महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.



मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, पुदुचेरी आणि केरळ या पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा होऊ शकते. त्यासोबतच महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाकडून केली जाण्याची शक्यता आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिल्यानंतर उपमुख्यमंत्री पदाची सूत्रे सुनेत्रा पवार यांनी स्विकारली. मात्र, नियमानुसार सहा महिन्यांत विधिमंडळाच्या विधानसभा किंवा विधानपरिषद यापैकी एका सभागृहाचे सदस्य असणे अनिवार्य आहे. पण सध्या यापैकी कोणत्याही सभागृहाच्या सदस्या सुनेत्रा पवार नाहीत. त्यामुळे बारामती पोटनिवडणूक त्या लढणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभेचे भारतीय जनता पक्षाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे ऑक्टोबर मध्ये निधन झाले. तेव्हापासून राहुरी विधानसभेची जागा रिक्त आहे. त्यामुळे पोटनिवडणुकीत या मतदारसंघातून कोणाला उमेदवारी दिली जाणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

## वसंत मोरे यांच्या विरोधात ॲट्रोसिटी ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल



**पुणे, ता. ६ :** पुण्यातील माजी नगरसेवक आणि शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते वसंत कृष्णाजी मोरे यांच्या विरोधात ॲट्रॉसिटी ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याने पुण्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

पुण्यातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये विश्वनाथ तुकाराम लहाडे (वय-७२) यांनी दिलेल्या तक्रारीनंतर हा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. वसंत मोरे यांच्यावर पत्रकार परिषदेत विश्वनाथ लहाडे यांचा उल्लेख करत त्यांच्याबाबत आक्षेपार्ह आणि बदनामीकारक वक्तव्य केल्याचा आरोप आहे. २५ फेब्रुवारी रोजी पुणे महानगरपालिकेत वसंत मोरे यांनी पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेत त्यांनी फिर्यादी विश्वनाथ लहाडे यांचा उल्लेख ते अनुसूचित जातीचे असल्याची माहिती असतानाही जाणीवपूर्वक व हेतूपूर्वक अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोप केला आहे. फिर्यादी विश्वनाथ लहाडे यांनी शिवाजीनगर पोलिसांत दिलेल्या तक्रारीत वसंत मोरे यांनी लहाडे इतका दारू पिला होता की त्याला बोलताही येत नव्हते, ओढ्यामध्ये उतरून गटारे साफ करत आहे असे अपमानास्पद वक्तव्य केले होते. तसेच हे वक्तव्य सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आल्याचा आरोपही फिर्यादींनी केला आहे. यामुळे आपली सामाजिक बदनामी झाली असून, कुटुंबीयांवर मानसिक ताण आला आहे, असे देखील तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिसांनी वसंत मोरे यांच्या विरोधात ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## संकष्टी चतुर्थी निमित्त श्री महागणपतीच्या दर्शनासाठी भक्तांच्या रांगा

**पोपट पाचंगे**

रांजणगाव गणपती, ता. ६ : अष्टविनायकांपैकी एक असलेल्या श्री येथे संकष्टी चतुर्थी निमित्त भाविकांची अलोट गर्दी झाली होती. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषात भाविकांनी श्री महागणपतीचे मनोभावे दर्शन घेतले.



पहाटे पाच वाजता श्रींचा अभिषेक करून मंदिर भाविकांसाठी दर्शनासाठी खुले करण्यात आले. संकष्टी चतुर्थी निमित्त देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित सामूहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी देवस्थान ट्रस्टच्या वतीने सुलभ दर्शन व्यवस्था, खिचडी प्रसाद, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच उन्हाच्या तीव्रतेमुळे मंडपाची सोय करण्यात आली होती. दुपारी १२ वाजता देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव यांच्या हस्ते श्रींची महापूजा व महानैवेद्य करण्यात आला. प्रगतशील शेतकरी नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर यांच्या वतीने मंदिर गाभारा व सभामंडपात विविध रंगी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. तसेच गणेशभक्त भावेश कामदार यांनी १०१ डझन केळींचा महाप्रसाद, तर रमेश थोरात यांनी २०१ कलिंगडांचा महाप्रसाद श्रींच्या चरणी अर्पण केला. दुपारच्या सत्रात श्री महागणपती भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. दरम्यान, रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली मंदिर परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# युद्धामुळे खाद्यतेलासह सुका मेवा, खजूर, डाळी महागल्या

**मुंबई, ता. ६ :** आखाती युद्ध सुरू आहे. आखाती युद्धाचा परिणाम आपल्या किचनवर दिसायला सुरुवात झाली आहे. देशभरातील बाजारामध्ये खाद्यतेलापासून तर खजूर, बदाम, पिस्ता, अंजीर महाग होऊ लागले आहे. हिंदुस्थान इराणमधून खाद्यतेल आणत नाही; मात्र हिंदुस्थान आपल्या गरजेचे ६० टक्के खाद्यतेल अन्य देशांतून आणतो. म्हणजे इंडोनेशिया, मलेशियातून पाम तेल, अर्जेंटिना आणि ब्राझीलमधून सोयाबीन तेल, रशिया-युक्रेनमधून सूर्यफुलाचे तेल आणतो. युद्धामुळे क्रूड ऑईल महागले आहे. त्यामुळे बायोफ्युएल तयार करण्यासाठी पाम आणि सोया तेलाचा वापर जास्त केला जातोय. त्यामुळे खाद्यतेलाच्या पुरवठ्यात घट झाली आहे. परिणामी त्यांच्या किमती वाढत आहेत.



इंडियन व्हेजिटेबल ऑइल प्रोड्युसर्स असोसिएशनचे अध्यक्ष आणि इमामी एग्रोटेकचे सीईओ सुधाकर देसाई यांनी सांगितले की, अमेरिका आणि इराणमध्ये कोणत्याही प्रकारच्या तणावाचा परिणाम हिंदुस्थानातील क्रूड ऑइल आणि कुकुंग ऑइलच्या बाजारावर थेट परिणाम होईल. क्रूड ऑइलच्या किंमत वाढीमुळे पेट्रोल-डिझेल आणि फॉसिल फ्यूल महाग होते. यामुळे प्रत्येक गोष्टीचा लॉजिस्टिक्स खर्चवाढतोआणित्यामुळेजहाजांसाठी विमा जोखीमदेखील वाढू शकते. इराण आणि अफगाणिस्तानातून येणारे पिस्ता, केसर, अंजीर या सुका मेव्याचा पुरवठा ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे सुका मेव्याच्या किमती वाढत आहेत.

तूर, उडीद, मसूर डाळीची आयात म्यानमार, पॅनडा, ऑस्ट्रेलिया या देशांतून करतो. होर्मूज सामुद्रधुनीच्या नाकाबंदीमुळे पश्चिम आशियात अडकलेल्या जहाजांना, कंटेनर्सना लांबचा रस्ता कापावा लागता आहे. त्यामुळे या वस्तूंना हिंदुस्थानात आणण्याचा खर्च वाढला आहे. अशातच कांद्याच्या किमतीतही वाढ दिसून येत आहे.

# आसाममध्ये झालेल्या हवाई दलाच्या विमान अपघातात दोन वैमानिक शहीद

**आसाम, ता. ६ :** आसाममध्ये भारतीय हवाई दलाचे सुखोई लढाऊ विमान कोसळले. या अपघातात वैमानिक गंभीर जखमी झाले होते आणि आता त्यांचा मृत्यू झाला आहे. बचाव पथकांनी अपघातग्रस्त विमानाचे अवशेष आणि शहीद सैनिकांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. भारतीय हवाई दलाने त्यांच्या एक्स हँडलवर अपघाताची माहिती पोस्ट केली आहे, ज्यामध्ये शहीद सैनिकांची माहिती आहे आणि शोकग्रस्त कुटुंबांना शोक व्यक्त केला आहे.

भारतीय हवाई दलाने म्हटले आहे की प्रशिक्षण मोहिमेवर असलेले Su-३०MKI लढाऊ विमान आसाममध्ये कोसळले. कार्बी आंगलोंग परिसरातील एका टेकडीवरून संपर्क तुटल्यानंतर विमान बेपत्ता झाले. त्याचे अवशेष सापडले आहेत. या अपघातात भारतीय हवाई दलाने स्क्वाड्रन लीडर अनुज आणि फ्लाइट लेफ्टनंट पूर्वेश दुरागर यांना गमावले.



भारतीय हवाई दल दोन्ही शहीद सैनिकांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त करते आणि या दुःखाच्या वेळी शोकग्रस्त कुटुंबांसोबत ठामपणे उभे आहे. दोन्ही सैनिकांवर पूर्ण राजकीय सन्मानाने अंत्यसंस्कार केले जातील. वायू दलाच्या म्हणण्यानुसार, प्रशिक्षण विमानाने गुरुवारी संध्याकाळी जोरहाड हवाई तळावरून उड्डाण केले. संध्याकाळी पाऊणे आठच्या सुमारास, विमानाचा टेकडीवरील नियंत्रण कक्षाशी संपर्क तुटला. त्यानंतर, विमानाशी संपर्क तुटला. जेव्हा हवाई दलाच्या बचाव पथकाने शोध मोहीम सुरू केली तेव्हा त्यांना विमान कोसळल्याचे आढळले. शुक्रवारी सकाळी, हवाई दलाचे शोध आणि बचाव पथक, नागरी आणि पोलिस अधिकाऱ्यांसह, गावकऱ्यांच्या मदतीने अपघातस्थळी पोहोचले.

गावकऱ्यांनी मोठा स्फोट ऐकला आणि टेकडीवरून ज्वाला उठताना पाहिल्याची माहिती दिली. काही वेळानंतर, त्यांना विमान बेपत्ता झाल्याचे वृत्त कळले.

ज्वाला आणि काळ्या धुराचे ठिकाण वस्तीपासून खूप दूर होते. त्यांनी पोलिसांना कळवले. त्यानंतर, काही लोक आले आणि म्हणाले की त्यांना टेकडीवर जावे लागेल आणि दिशा विचारली.

# लोणी काळभोर येथे ट्रकची कारला जोरदार धडक

**लोणी काळभोर, ता. ६ :** पुणे-सोलापूर महामार्गावरील कवडीपाठ टोलनाक्याजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने कारला पाठीमागून जोरदार धडक दिल्याची घटना घडली. कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील काळभोर लॉन्स समोरील दुभाजकाजवळ गुरुवारी (ता. ०५) दुपारी साडेतीन वाजता हा अपघात झाला. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. याप्रकरणी ट्रकचालकावर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




संदीप होले (पूर्ण नाव माहिती नाही वय -५५, रा. बेटवाडी, ता. दौंड, जि. पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या ट्रकचालकाचे नाव आहे. याप्रकरणी गणेश शिवाजीराव देशमुख (वय -३७, रा. मिरावेत, डिस्ट्रीक फेज-१, प्लॅट डी-२०६, रावेत, जि.पुणे) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश देशमुख हे पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी येथे असिस्टंट प्रोफेसर म्हणून कार्यरत आहेत. ते त्यांच्या चारचाकी (एमएच १४ एमक्यू ७५२७) या कारने पीएचडीच्या शैक्षणिक कामानिमित्त दुपारी सुमारे दोन वाजता रावेत येथून एमआयटी कॉलेज, लोणी काळभोर कडे निघाले होते.

दरम्यान, दुपारी सुमारे साडेतीन वाजण्याच्या सुमारास ते कवडीपाठ टोलनाक्याच्या पुढे काळभोर लॉन्ससमोरील दुभाजकाजवळ आले असता समोरून मोटारसायकल येत असल्याने त्यांनी कारचा वेग कमी केला. त्याचवेळी पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या ट्रकने (एमएच १६ टी ५२८६) देशमुख यांच्या कारला जोरदार धडक दिली.

या धडकेत कारची पाठीमागील काच फुटून डिकीचा भाग चेंबला असून वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातात कोणीही जखमी झाले नसले तरी दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. याप्रकरणी देशमुख यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ट्रकचालक संदीप होले यांच्यावर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास लोणी काळभोर पोलीस करीत आहेत.

# अनिल अंबानींच्या अडचणीत वाढ; ईडीकडून मुंबईत १० ते १२ ठिकाणी छापेमारी

**मुंबई, ता. ६ :** प्रसिद्ध उद्योगपती अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड आणि त्यांच्याशी संबंधित कंपन्यांच्या आवारात ईडीने शुक्रवारी (ता. ६) मोठी छापेमारी केली.

मिळालेल्या माहितीनुसार, ईडीच्या सुमारे १५ पथकांनी एकाच वेळी १० ते १२ ठिकाणी धाड टाकली आहे. या कारवाईत रिलायन्स पॉवर लिमिटेडशी संबंधित व्यक्ती आणि कंपन्यांच्या व्यवहारांची तपासणी केली जात केली जात आहे. बँक फसवणूक आणि मनी लाँड्रिंगशी संबंधित जुन्या प्रकरणांचा तपास पुढे नेण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे.



ईडीने अनिल अंबानींना चौकशीसाठी अनेक वेळा समन्स बजावले आहेत. ज्यामध्ये फेब्रुवारी २०२६ मध्ये ९ तासांपेक्षा जास्त काळ चौकशी करण्यात आली होती. आता ईडीने थेट छापेमारी केल्याने अनिल अंबानींचा अडचणी आणखी वाढल्याचे चित्र आहे. ईडीने आरकॉमचे माजी संचालक, सहकारी आणि संबंधित व्यक्तींच्या घरांवर आणि कार्यालयांवर लक्ष केंद्रित केले आहे. हा छापा आरकॉमशी संबंधित ४० हजार कोटींपेक्षा जास्त किमतीच्या बँक फसवणूक आणि मनी लाँड्रिंग प्रकरणाचा एक भाग आहे.

छापेमारीत ईडीने कागदपत्रे, डिजिटल उपकरणे आणि इतर पुरावे जप्त केले असल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र, अधिकृतपणे याबाबत माहिती जारी करण्यात आलेली नाही. सूत्रांनी माहितीनुसार, आजच्या छाप्यात कागदपत्रे, डिजिटल उपकरणे आणि इतर पुरावे जप्त केले जात आहेत. ईडीने अनिल अंबानींचे मुंबईतील आलिशान निवासस्थान, अॅबोड आधीच जप्त केले आहे. याव्यतिरिक्त, १५ हजार कोटींपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई प्रामुख्याने विविध बँकांकडून कर्जाचा गैरवापर केल्याच्या आरोपांवरुन केली जात आहे.

आरकॉमने एसबीआय आणि येस बँकेसह विविध बँकांकडून घेतलेले कर्ज संबंधित संस्था आणि परदेशी खात्यांमध्ये वळवले असल्याचा आरोप आहे. त्यात चीनच्या सरकारी मालकीच्या बँकांना १६,५५८ कोटी रुपयांचे कर्ज दिल्याचाही उल्लेख आहे. मनी लाँड्रिंगचा आरोप असून ही चौकशी २०१९ च्या सीबीआय एफआयआरवर आधारित आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) एक विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले असून, या प्रकरणाची चौकशी करत आहे.

### १७ मजली घर ॲबोड कारवाईत जप्त

२०१९ च्या सीबीआय एफआयआरच्या आधारे ईडी या प्रकरणाची चौकशी करत आहे. यापूर्वी तपास यंत्रणेने अनील अंबानींचे मुंबईतील १७ मजली घर ॲबोड जप्त केले होते. रिलायन्स पॉवर ही वीज निर्मिती आणि वितरण क्षेत्रातील एक आघाडीची कंपनी आहे. ही कंपनी अनिल अंबानी यांच्या नेतृत्वाखालील रिलायन्स ग्रुपचा भाग आहे. तिच्या पोर्टफोलिओमध्ये थर्मल (कोळसा आणि वायू), अक्षय (सौर, पवन आणि जलविद्युत), आणि बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम यांचा समावेश आहे.